Pre-Mix Food ई-निविदेच्या Pre Bid Meeting चे इतिवृत्त

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत असलेल्या अंगणवाडीतील ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहारांतर्गत Pre Mix Food चा पुरवठा करणेसाठी महिला मंडळ/महिला बचत गट/महिला संस्था यांचेकडून ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. या कार्यालयाचे पत्र क्र. २११९ दि. १५/०७/२०१७ नुसार संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय यांना Pre Mix Food च्या ई-निविदेची सूचना मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यासाठी दिल्याने त्यांचेमार्फत पुण्यनगरी (मराठी वृत्तपत्र) व दी इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी वृत्तपत्र) यामध्ये दि. २० जुलै, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली. सदर ई-निविदेच्या सूचनांमध्ये दि. २६/७/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता Pre-Bid Meeting आयोजित केलेली असल्याचे प्रसिध्द करण्यात आली होते. त्याअनुषंगाने सदर निविदेची Pre bid Meeting दि. २६/७/२०१७ रोजी कोकण भवन, नवी मुंबई येथील समिती सभागृहात सकाळी ११.३० वाजता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली.

ई-निविदेच्या Pre bid Meeting मध्ये उपस्थित सर्व महिला मंडळ/महिला बचत गट/महिला संस्थांचे प्रतिनिधीचे स्वागत करुन बैठकीची सुरुवात करण्यात आली. सदर Pre bid Meeting मध्ये महिला मंडळ/महिला बचत गट/महिला संस्थांचे २३९ प्रतिनिधी उपस्थित होते. त्यापैकी खालील महिला मंडळ/महिला बचत गट/महिला संस्थांचे प्रतिनिधींनी आक्षेप नोंदविला आहे.

१) श्रीमती संगीता कांबळे- {अखिल भारतीय शालेय पोषण व अंगणवाडी आहार पुरवठाधारक व कर्मचारी संघटना (CITU)}- यांनी सदर टेंडर कंपन्यांसाठी आहे, महिला मंडळ/महिला बचत गट/महिला संस्थांसाठी नाही. ग्रामीण भागामध्ये इंटरनेटची सुविधा नाही त्यामुळे ई-निविदा ग्रामीण भागात भरणे शक्य होणार नाही, यासाठी साध्या पध्दतीने टेंडर मागविण्यात यावे, त्यामुळे ही निविदा रद्द करावी.

२) सौ. सरोजिनी सकटे (रिध्दी सिध्दी विकाशित महिला संस्था, आर्वी, जि. वर्धा) यांनी कोणाला टेंडर मंजूर करावयाचे हे आधीच ठरलेले असल्याने टेंडर कशासाठी काढले, महिला व बाल विकास विभाग आहे. त्यामध्ये महिलांचे सक्षमीकरण न होता महिलांना काम मंजुर होणार नाही असे टेंडर काढले जाते. १० महिन्यांपासून आहाराचे बील मिळालेले नाही. त्यामुळे ही निविदा रद्द करावी.

३) मानली महिला बचत गट, आर्वी, जि. वर्धा यांचे प्रतिनिधी यांनी ई-टेंडरसाठी ग्रामीण भागामध्ये इंटरनेटची सुविधा नाही त्यामुळे ई-निविदा ग्रामीण भागात भरणे शक्य होणार नाही, यासाठी साध्या पध्दतीने टेंडर मागविण्यात यावे, त्यामुळे ही निविदा रद्द करावी.

४) जननी महिला बचत गट, आर्वी, जि. वर्धा यांचे प्रतिनिधी- कमी दर असताना आम्ही काम करत होतो, आता दर वाढ झाली तर नवीन टेंडर काढले आहे. आम्हाला एवढया कमी रक्कमेत परवडत नाही. त्यामुळे ही निविदा रद्द करावी.

५) श्रीमती चंद्रकला गो. पाटील, (गायत्री महिला बचत गट, पुलगांव)- शासनाने दर वाढविले आंणि नवीन टेंडर काढले, सदर टेंडर गरम ताजा आहाराचे नसून प्रिमिक्स आहाराचे आहे मुलांना कंपनीचे खाद्य खाऊ घालण्यात येणार आहे. मुले ताजे अन्न खातात.

६) श्रीमती रंजना गायकवाड- सद्या आम्ही ४ अंगणवाडयांना काम करित आहोत, कोटयांवधीचा टर्नओव्हर कुठून आणणार

७) श्रीमती स्मिती अविनाश भावे, सोलापूर- इंग्रजीमध्ये निविदा निघाली आहे, मराठीत निविदा अर्ज काढावा, ई-टेंडर पध्दत नको, प्रीमिक्स आहाराऐवजी स्थानिक गरम ताजा आहार द्यावा, सद्या चालू असलेल्या पाककृती ठेवाव्यात.

८) श्रीमती सुप्रिया सुर्यवंशी, सांगली- मा. सुप्रीम कोर्टाचे आदेश स्थानिक महिला मंडळ/महिला बचत गट/ग्राम समुदाय यांचेकडून आहाराचा पुरवठा करणेबाबतचे आहेत. त्यामुळे Centralies टेंडर का काढण्यात आले. जिल्हास्तरावरुन De-centralies टेंडर का काढण्यात आले, त्यामुळे सदर टेंडर रद्द करावे.

९) श्रीमती मनिषा जोशी (समृध्दी महिला बचत गट, सोलापूर)- तालुका निहाय टेंडर काढावे, गरम ताजा आहाराचा अर्थ स्थानिक स्तरावर शिजविलेला आहार होतो, त्यामुळे टेंडर हे गरम ताजा आहाराचे नसून प्री-मिक्स चे आहेत. टेंडर हे ठरविलेल्या ३ कंपन्यासाठीच आहे.

१०) श्रीमती माधूरी ढेपे, (सुकेशिनी महिला बचत गट यवतमाळ)- तालूका निहाय टेंडर काढावे, टर्न ओव्हर एका तालुक्यापूरता असावा.

११) श्रीमती ज्योती खोब्रागडे- आम्ही इतक्या दिवसापासून कमी पैशात काम करत होतो, आता आहाराच्या दरात १ रुपया वाढ झाल्याने मोठया लोकांसाठी टेंडर काढले गेले का ? मशीनची सिडी सोबत सादर करावयाची आहे. तर तुम्ही टेंडर मध्ये काम देण्याची हमी देणार असाल तर आम्ही मशीनरी बसवितो.

१२) श्रीमती अनुराधा कुलकर्णी- हे टेंडर प्रायव्हेट कंपन्यांसाठी आहे. बचत गटांसाठी नाही. आहारामध्ये केंद्र शासनाने सन २०१५ पासून १ रुपया वाढ केलेली आहे. त्यामुळे सदर दरवाढ सन २०१५ पासून लागू करुन फरक देण्यात यावा.

१३) श्रीमती जयश्री पांचाळ (श्रमिक महिला, मुंबई)- राज्य शासन अशा प्रकारचे टेंडर काढून आई जेवायला घालत नाही आणि बाप भीक मागू देत नाही अशी अवस्था महिला बचत गट/महिला मंडळाची करुन ठेवलेली आहे. हे टेंडर बचत गटांना भरता येणार नाही, त्यामुळे हे टेंडर तात्काळ रद्द करावे. व नव्याने निविदा काढाव्यात.

१४) श्रीमती आरमायली इराणी, {अखिल भारतीय शालेय पोषण व अंगणवाडी आहार पुरवठाधारक व कर्मचारी संघटना (CITU)}- गरम ताजा आहाराचे काम खाजगी कंपन्यांना देऊ नये, On Line टेंडर काढू नये, आहाराचा दर प्रति लाभार्थी रु.१५/- करावा. ई-टेंडर तात्काळ मागे घ्यावे, नवीन निविदा काढाव्यात.

१५) श्रीमती सरोजनी सपटे- चेम्बुर- प्री-मिक्सचे टेंडर काढल्यामुळे बचत गटांना बंद करण्याचे षडयंत्र आहे. टेंडर तालुकानिहाय काढावे.

१६) श्रीमती वंदना डोंगरे (आदिमाया म. मंडळ, ठाणे)- गरम ताजा आहाराचे टेंडर काढावे, प्रीमिक्सचे टेंडर काढू नये यामुळे बचत गट बंद पडतील, तरी तालुकानिहाय टेंडर काढावे.

१७) श्रीमती दिपिका सहाणी (मातृछाया, मुंबई) यांनी मा. सुप्रीम कोर्टाच्या दि. ७/१०/२००४ च्या आदेशान्वये स्थानिक महिला मंडळ/महिला बचत गट/ग्राम समुदाय यांना काम द्यावे. बचत गट टेंडर भरु शकत नाहीत. हे टेंडर कंपन्याना Back door entry आहे. आहाराच्या दरात रु १/- वाढ झाल्याबरोबर हे टेंडर काढले गेले. मा. सुप्रीम कोर्टाच्या दि. १३ डिसेंबर २०१६ च्या आदेशामध्ये महिला मंडळ/महिला बचत गट टेंडर भरु शकतील अशा अटी व शर्ती ठेवाव्यात असे नमुद आहे. सदर टेंडर हे ३ संस्थांसाठीच आहेत.

१८) श्रीमती शारदा कुऱ्हाडे, नागपूर- आमचा गट हा विधवा बायकांचा आहे. विधवा महिलांकडून काम जात आहे. अशा जाचक अटींमुळे आम्ही टेंडर कसे भरु शकतो, टेंडर रद्द करावे, व स्थानिक स्तरावर टेंडर काढावे.

१९) श्री. माधव डोम्पले, नांदेड (बचत गटांचे प्रतिनिधी)- टेंडर मराठीतून काढावे, प्रीमिक्सच्या पाककृती हया पहिल्यांदाच समजल्या आहेत. त्या पाककृतीच्या मशीनी कशा बसविता येतील, १८ दिवसांत युनिट उभे करणे शक्य नाही. युनिट नसल्यामुळे व्हिडीओ शुटींग कशाची करायची. महाराष्ट्रामध्ये ३ ते ४ महिला संस्थांमार्फत १ वर्षापासून युनिट बसविले आहे. त्यांचेसाठीच टेंडर काढले आहे. सन २०१३ मध्ये THR चे

टेंडर स्थानिक स्तरावरुन प्रकल्पनिहाय काढले, सन २०१६ मध्ये THR चे टेंडर राज्यस्तरावरुन सेक्टर निहाय/जिल्हानिहाय काढले, व सन २०१७ मध्ये राज्यस्तरावरुन प्रीमिक्सचे टेंडर पुन्हा जिल्हानिहाय काढले, Public Liability Insurance देण्यास विमा कंपन्या टाळाटाळ करतात. त्यामुळे टेंडर रद्द करावे व नव्याने काढावे.

२०) श्री. राजेंद्र प्रसाद, बीड (बचत गटांचे प्रतिनिधी)- १९७५ पासून ३ ते ६ वर्षे मुलांना गरम ताजा आहार देण्यात येत आहे. आता ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांना मायक्रोन्युट्रीयन्ट फोर्टीफाईड आहार द्यावा असे कोणत्याही शासन निर्णयात नमुद नाही. तुम्ही टेंडर मध्ये THR चा अनुभव मागितलेला आहे. गरम ताजा आहार पुरवठयाचा अनुभव ग्राहय धरणार का? जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत आहे. आजपर्यंत त्यांचेमार्फतच गरम ताजा आहारासाठी महिला मंडळ/बचत गट/महिला संस्था नेमण्यात येत होते. सदर लाभार्थ्यांना प्री-मिक्स आहार देण्याबाबत कोणत्या न्यायालयाचे आदेश आहेत. सन २०१३ च्या टेंडरमध्ये संस्थांना काम देऊ नये असे म्हटले होते मग आता संस्थांना काम का देत आहेत.

२१) श्रीमती किर्ती कारवा (सिध्दीविनायक बचत गट, अमरावती)- शासनाचे ३ लाखाच्या वर ई-टेंडर काढण्याचे आदेश आहेत. त्यामुळे हे टेंडर जिल्हास्तरावरुन जिल्हाधिकारी यांचे मार्फत प्रकल्पनिहाय टेंडर काढावे. व प्रकल्पाचा टर्न ओव्हर धरावा. टेंडर मराठीत काढावे. THR संदर्भातील केस मा. सुप्रीम कोर्टात अजून सूरु आहे. कोर्टात केस पेंडींग असतांना हे टेंडर कसे काढले गेले, फक्त २० दिवसात प्रीमिक्सची मशीन बसविणे कसे शक्य आहे. हया टेंडरमध्ये रोस्टर व Extrusion दोन्ही प्रकारे आहार बनविणे टाकलेले आहे. त्यामुळे नेमके एकच कोणतेतरी सांगावे, ही निविदा रद्द करण्यात यावी.

वरील प्रमाणे महिला मंडळ/बचत गट/महिला संस्थाच्या आक्षेपावर आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी सर्व उपस्थित प्रतिनिधींना सांगितले की, सदर योजना ही बालकांसाठी आहे. त्यामुळे बालकांसाठी काम करावयाचे आहे. शासनाचा कोणताही वाईट हेतू नाही, बैठकीत जेवढे मुद्दे उपस्थित केले आहे. ते शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येतील. कोणावरही अन्याय होणार नाही. याची दक्षता घेण्यात येईल. सदर निविदेचा कालावधी कमी असल्याने यापूढील निविदा मराठी व इंग्रजी मध्ये प्रसिध्द करण्यात येतील याची काळजी घेतली जाईल. दरवाढीच्या शासन निर्णयात नेमके काय म्हटले आहे त्याचा विचार करुन तसेच सदर दरवाढ केव्हापासून लागू करावी हयाबद्दल शासन जे ठरविल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

काही महिला मंडळ/महिला बचत गट/महिला संस्थाच्या प्रतिनिधींनी बैठकीमध्ये दिलेली निवेदने स्वीकारुन Pre Bid meeting साठी उपस्थित सर्व महिला मंडळ/महिला बचत गट/महिला संस्थाच्या प्रतिनिधींचे आभार मानून बैठक संपल्याचे घोषित करण्यात आले.




२७/७/१७

(कमलाकर फंड, भाप्रसे)
आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई